निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २७१ वा.
शुक्रवार :०५ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# नरेंद्र मोदी- पुतिन यांचा एकाच कारमधून प्रवास

## दोन्ही नेते महाराष्ट्र पासिंग SUV Toyota फॉर्च्यूनरमधून रवाना

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली / प्रतिनिधी** / रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन भारतात दाखल झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचं पालम विमानतळावर मोठ्या उत्साहात स्वागत केलं. पुतिन विमानातून बाहेर येताच मोदींनी हस्तांदोलन केलं, त्यानंतर दोन्ही नेत्यांनी गळाभेट घेतली. यानंतर दोन्ही नेत्यांनी एकाच कारमधून लोक कल्याण मार्ग येथील पंतप्रधान निवासस्थाच्या दिशेनं पर्वास केला. विशेष बाब म्हणजे व्लादिमीर पुतिन आणि नरेंद्र मोदी यांनी ज्या कारमधून प्रवास केला ती महाराष्ट्रात पासिंग झालेली होती. डणत द्वेंर फॉर्च्यूनरमधून दोन्ही नेत्यांनी प्रवास केला. तीन महिन्यांपूर्वी शांघाई शिखर संमेलनात मोदी आणि पुतिन यांनी एकाच कारमधून प्रवास केला होता.



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि व्लादिमीर पुतिन यांची तीन महिन्यापूर्वी शांघाय शिखर संमलेनात भेट झाली होती. त्यावेळी दोन्ही नेत्यांनी एका बैठकीनंतर एकाच कारमधून प्रवास केला होता. शांघाय शिखर संमेलन चीनच्या तियानजीन शहरात आयोजित करण्यात आलं होतं. त्यानंतर मोदी आणि पुतिन द्वीपक्षीय चर्चेसाठी एकाच कारमधून रवाना झाले होते.

**मोदी आणि पुतिन यांचा महाराष्ट्र पासिंग कारमधून प्रवास**

नरेंद्र मोदी यांनी पालम विमानतळावर व्लादिमीर पुतिन यांचं स्वागत केलं. यानंतर दोन्ही नेते डणत द्वेंर फॉर्च्यूनरमधून पंतप्रधान निवासस्थानाच्या दिशेनं रवाना झाले. ही कार महाराष्ट्र पासिंग असल्याचं व्हिडिओ पाहिल्यांनतर स्पष्ट होतं. त्या कारचा नंबर चक०१एछ५७९५ असा आहे.

**दोन्ही नेत्यांचा एकाच कारमधून प्रवास, ट्रम्प यांना मेसेज?**

शांघाय शिखर परिषदेच्या वेळी व्लादिमीर पुतिन आणि नरेंद्र मोदी यांनी एकाच कारमधून प्रवास करत रशिया आणि भारताचे संबंध मजबूत असल्याचा संदेश देण्यात आला होता, अशा चर्चा त्यावेळी झाल्या होत्या. ट्रम्प यांनी दबाव टाकून देखील दोन्ही देशांचं संबंध कमजोर झाले नसल्याचे त्यातून दर्शवण्यात आलं होतं. आज पुन्हा एकदा दोन्ही नेत्यांनी एकाच कारमधून प्रवास केला आहे.

**मोदी स्वागताला आल्यानं आश्चर्य : क्रेमलिन**

रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन यांच्या स्वागताला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहतील याचा अंदाज नव्हता असं रशियाचं राष्ट्रपती भवन क्रेमलिनकडून सांगण्यात आलं. दरम्यान, व्लादिमीर पुतिन २३ व्या भारत रशिया समिटमध्ये सहभागी होण्यासाठी भारतात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आमंत्रणावरुन पुतिन भारत दौऱ्यावर आले आहेत. रशिया यूक्रेन युद्ध सुरु होण्यापूर्वी म्हणजेच डिसेंबर २०२१ ला व्लादिमीर पुतिन भारताच्या दौऱ्यावर आले होते. त्यानंतर चार वर्षांनी पुतिन भारतात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२४ मध्ये मॉस्कोत पुतिन यांची भेट घेतली होती.

## संक्षिप्त

### ओमराजे संतापले, मंत्र्यांविरुद्ध हक्कभंग आणणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली / प्रतिनिधी** /अतिवृष्टीनंतर महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविलेला नाही, अशी माहिती कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मंगळवारी लोकसभेत दिली होती. अतिवृष्टीमुळे १४ लाख हेक्टर शेती नष्ट झाल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली होती; परंतु महाराष्ट्र सरकारने केंद्राला एक लाख १० हजार ३०९ हेक्टर शेती नष्ट झाल्याचे सांगितले आहे. याच मुद्यावरुन शिवसेना ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे.

आधी गृहमंत्रालयाने कृषी मंत्रालयाने लिहून दिलं की अजून प्रस्ताव आलेला नाही. तुमच्या माध्यमातून बातम्या झाल्यानंतर कृषीमंत्री म्हणाले की राज्यकडून प्रस्ताव आलेला आहे. सर्वोच्च सभागृहात त्यांनी असं म्हटलं आहे. हे खासदारांच्या विशेषाधिकारात येतं, त्यामुळं लोकसभा अध्यक्षाकडे दाद मागणार आहे.

मंत्री खोटं उत्तर देत असतील तर ते दुर्दैवी आहे. दुर्लक्ष झालं असेल तर कबूल करा ना. पण अशाप्रकारे राज्यातील सरकारला प्रोटेक्ट करत आहेत. आजपर्यंत कोणत्याही मंत्र्याने असं रेकॉर्डवर खोट उत्तर दिलेलं पाहिलं नाही असे ओमराजे म्हणाले. प्रस्ताव केंद्राकडे येत नाही तर डबल इंजिन चा काय उपयोग? असा टोला देखील ओमराजे निंबाळकर यांनी लगावला.

## दैनिक आत्ताच एक्सप्रेस बातमीचा इफेक्ट

# गंगापूर प्रभाग क्रमांक ५ मध्ये सिमेंट रस्त्याच्या कामाला वेग - नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर / प्रतिनिधी**/ गंगापूर शहरातील नगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ५, जुना मांजरी रोड परिसरातील सिमेंट रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून कासवगतीने सुरू असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. ये-जा करताना रस्त्याची दैना पाहता नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी होती.दैनिक आत्ताच एक्सप्रेस मध्ये ही बातमी प्रसिद्ध होताच ठेकेदाराने तात्काळ दखल घेत कामाला वेग दिला. ठप्प पडलेले रस्त्याचे काम पुन्हा सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून आनंदाचे वातावरण पसरले आहे.





निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

आत्ताच एक्सप्रेस

**सिमेंट रस्त्याचे काम कासव गतीने सुरु परिसरातील नागरिकांची गैरसोय ठेकेदाराचा मनमानी कारभार**

आत्ताच एक्सप्रेस

गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा/ गंगापूर शहरातील नगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक ५ जुना मांजरी रोड या परिसरात सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत कासव गतीने सुरू असल्यामुळे या परिसरातील नागरिकांना या रस्त्यावरून ये जा करण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मागील एक महिन्यापासून या परिसरातील सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे. ठेकेदार याचा मनमानी कारभार असल्यामळे पासून काम बंद करून देण्यात आले आहे या रस्त्यावरून रात्रीचं नागरिकांना चालना म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे आहे. सध्या नगरपरिषद निवडणूकीची मनमानी पद्धतीने हे काम करत असल्याची चर्चा आहे. लवकरात लवकर हे काम पूर्ण करावी अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे. या



मागील २० वर्षांत गंगापूरचा अपेक्षित विकास झाला नाही. मात्र माझ्या कार्यकाळात शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी मी प्रयत्नशील राहिलो. सत्ता असो वा नसो, जनतेच्या हितासाठी मी नेहमी एक पाऊल पुढे राहीन, असे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रदीप भैय्या पाटील यांनी आत्ताच एक्सप्रेस चे प्रतिनिधी सुभान शहा यांच्याशी बोलताना सांगितले.

गेल्या महिन्याभरापासून या परिसरातील सुमारे ५ ते ७ रस्त्यांची कामे बंद पडली होती. काही रस्त्यांवर फक्त खडी पसरवून काम अर्धवट सोडण्यात आले होते. त्यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी नागरिकांना या मार्गाने प्रवास करणे धोकादायक ठरत होते. ठेकेदाराच्या मनमानी कारभाराची चर्चा देखील स्थानिकांमध्ये होती.मात्र आत्ताच एक्सप्रेस मध्ये बातमी प्रकाशित होताच काम पुन्हा सुरू झाले. त्यामुळे स्थानिक रहिवाशांनी प्रतिनिधी सुभान शहा यांचे अभिनंदन करत कृतज्ञता व्यक्त केली.या वेळी कैलास गायकवाड, नागेश कवडे, रस्ते बांधकाम ठेकेदार तसेच परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# कन्नड नगरपरिषद निवडणुकीत निकाल विलंबामुळे समर्थकांची दमछाक

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड नगरपरिषद निवडणूक शांततेत आणि उत्साहात पार पडली असली तरी न्यायालयाच्या आदेशामुळे निकाल जाहीर होण्यासाठी तब्बल १७ ते १८ दिवसांचा विलंब झाल्याने सर्वच पक्षांच्या कार्यकर्ते-समर्थकांमध्ये मोठी निराशा पाहायला मिळत आहे.

या निवडणुकीत भाजपा-राष्ट्रवादी-शिवसेना शिंदे गट तसेच काँग्रेस पक्षाने प्रतिष्ठेचे रण उभारले होते.

तिन्हीही पक्षांनी आपल्या वरिष्ठ नेत्यांना शहरात आणून मतदारांना आकृष्ट करण्याचा मोठा प्रयत्न केला. त्यामुळे शहरात निवडणुकीचे चांगले वातावरण निर्माण झाले होते.





निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी निवडणूक आयोग, स्थानिक प्रशासन आणि पोलिस विभागाने दक्षता घेतली. प्रभावी बंदोबस्तामुळे मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली.

कन्नड शहरातील ३७,७८० मतदारांपैकी तब्बल २९,०२७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामुळे मतदानाचा टक्का ७६.९३ टक्क्यांवर पोहोचला.मात्र सायंकाळी न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणुकीचा अंतिम निकाल २१ डिसेंबरला जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाल्याने कार्यकर्त्यांचा उत्साह क्षणात मावळला. निकाल इतका उशिरा लागणार असल्याने सर्वच पक्षांचे समर्थक सतत आकडेमोडीत गुंग झाले आहेत.

राष्ट्रवादी-भाजपा युती, शिवसेना शिंदे गट आणि काँग्रेसचे समर्थक आपापल्या पद्धतीने कोणाला किती मते मिळतील याचे अंदाज लावताना दिसत आहेत. यामध्ये कोणाचा मतहिस्सा कोण कापेल, तसेच शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला मतदार कोणत्या गटाकडे झुकतात यावरच निवडणुकीचा निकाल बराचसा अवलंबून आहे, अशी चर्चा रंगत आहे.

अंतिम निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार असल्याने सर्व उमेदवार आणि त्यांचे समर्थक 'निकालाच्या प्रतीक्षेत' आहेत. तोपर्यंत उमेदवारांची अवस्था टांगणीला लागलेल्या जीवाप्रमाणेच असल्याचे चित्र दिसत आहे.

# आयडॉल शिक्षक शाळेसोबत समाजातही मोठा बदल घडवून आणतील- शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** शिक्षणातील आव्हाने स्वीकारत गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षण देणारे आयडॉल शिक्षक शाळेसोबत समाजातही मोठा बदल घडवून आणतील,असा विश्वास शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी आज व्यक्त केला. समर्पित भावनेने काम करणाऱ्या शिक्षकांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचेही ते म्हणाले.तापडिया नाट्यमंदिर येथे शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे आयडॉल शिक्षक एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे बोलत होते. यावेळी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह , राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अंकित, शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांच्यासह राज्यभरातील आयडॉल शिक्षक म्हणून निवड झालेले शिक्षक उपस्थित होते.

शिक्षणमंत्री श्री.भुसे म्हणाले, राष्ट्र प्रथम हा शिक्षण पद्धतीचा गाभा आहे, त्या दृष्टीने शासकीय शाळांमध्येही मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासन सातत्याने काम करत आहे. त्या दृष्टीने पीएमश्री योजनेच्या धर्तीवर राज्यातही सीएमश्री योजनेच्या माध्यमातून ५ हजार शाळांच्या इमारती बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. नुकतेच युपीएससी स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेले जवळपास ६० टक्के उमेदवार हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतून शिकलेले आहेत, शासकीय शाळेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते हे यावरून पहावयास मिळते. गरीब विद्यार्थी शिकला तर त्यांच्या कुटुंबाचीही प्रगती होते त्यामुळे शिक्षणाशिवाय पर्याय नाही. बदलत्या काळानुसार आधुनिक शिक्षण देण्यावर आपला भर असणार आहे. विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण देण्याचा दृष्टीने शिक्षक भरतीमध्ये कला व क्रीडा शिक्षक भरतीस प्राधान्य दिले जाईल असे ते म्हणाले. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशपातळीवर शिकविला जावा यासाठी केंद्राकडे मागणी केली असल्याचेही त्यांनी सांगितले.शिक्षकांनीही विद्यार्थ्यांशी संबंधित असलेल्या शासनाच्या योजनांची माहिती, त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे यांची माहिती संबंधित विद्यार्थ्यांपर्यत तसेच त्यांच्या पालकांपर्यंत पोहचवून त्यांना या योजनांचा लाभ मिळवून देण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करावा. त्यामुळे गरजू विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळू शकतो. शाळांमध्ये वर्षभरात विविध उपक्रमांबाबत राबविण्याबाबत शासन निर्णय जाहिर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.





शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम हे शिक्षकांच्या माध्यमातूनच होत आहे. एक शिक्षक जर बदल घडवू शकतो तर सर्व शिक्षक एकत्र आले तर मोठा बदल घडवू शकतात. अशा उपक्रमशील शिक्षकांमुळे महानगरपालिका, जिल्हा परिषद शाळांमध्ये पटसंख्या वाढली आहे. १ हजार शाळांमध्ये एआय लॅब सुरू करण्याचा निर्णय झाला असून लवकरच याचा लाभ विद्यार्थ्यांना मिळणार आहे. भविष्यात संशोधक विद्यार्थी घडविण्याच्या दृष्टीने शाळांमध्ये वेळोवेळी विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यासाठी शाळांना अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

कार्यशाळेत चंद्रपूर जिल्ह्यातील पालडोह (ता.जिवती) गावातील, दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळेला सुस्थितीत आणून व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा आदर्श निर्माण केला असे शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र परतेकी , गडचिरोली येथील शिक्षक खुर्शिद शेख, नाशिक जिल्ह्यातील हिवाळी (त्र्यंबकेश्वर) गावातील केशव गावित, तर पुणे जिल्ह्यातील जालिंदरनगर खेड येथील वाबळेवाडी शाळेचे वारे गुरूजी या आयडॉल शिक्षकांचा शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



## गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडून म्हाडाच्या कामकाजाचा आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**/छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये वर्किंग वुमेन्स होस्टेल व ओल्ड एज होम उभारण्यात येणार असून या प्रकल्पासाठी आवश्यक जागा, सुविधा आणि निधी नियोजन याबाबत तातडीने शासनाकडे प्रस्ताव सादर करा, असे निर्देश गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज दिले.गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या (म्हाडा), कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी बैठकीला मुख्य अधिकारी श्री. दत्तात्रय नवले, उप मुख्य अधिकारी श्री. जयकुमार नामेवार व कार्यकारी अभियंता श्री. सुधाकर बाहेगव्हाणकर यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते.महिलांच्या सुरक्षेसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानपूर्वक जीवनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे ही शासनाची जबाबदारी असून छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये वर्किंग वुमेन्स होस्टेल व ओल्ड एज होम उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी शासन म्हाडास सर्वोतपरी मदत करेल, असेही राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.असलेल्या योजनांची तसेच मंडळास्तरावर अद्यापपर्यंत एकुण किती प्रकल्प पूर्ण झाले, पीएमएवाय व २० टक्के अंतर्गत सुरू प्रकल्प, पूर्ण झालेले प्रकल्प, प्रस्तावित प्रकल्प, गाळे, भुखंड,सदनिका, तसेच दुकाने व अनिवासी भुखंड किती शिल्लक आहेत तसेच पैकी शिल्लक गाळे,सदनिका,भुखंड तसेच दुकाने व अनिवासी भुखंड विक्रीचे नियोजन याबाबतही आढावा घेण्यात आला.

# नरेंद्र मोदी दबावात येणारे नेते नाहीत

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारताच्या दोन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर येत असून या भेटीत भारत-रशिया दरम्यान अनेक महत्वाच्या करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची शक्यता आहे. अमेरिका भारतावर टॅरिफच्या माध्यमातून दबाव आणत असल्याबाबत विचारण्यात आले असता पुतिन यांनी मोठे वक्तव्य केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी दबावात येणारे नेते नाहीत, असे ते म्हणाले.

दौऱ्यापूर्वी इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत पुतिन यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, भारत-रशिया संबंध आणि पंतप्रधान मोदींसोबतच्या चर्चेविषयी भाष्य केले.

त्यांनी स्पष्टपणे सांगितले की जगाने भारताची ठाम परराष्ट्र धोरणाची दिशा पाहिली आहे. भारताला आपल्या नेतृत्त्वाचा अभिमान असला पाहिजे, असे ते म्हणाले.रशियाचे अध्यक्ष पुढे म्हणाले की, भारत-रशिया यांतील ९० टक्क्यांपेक्षा अधिक द्विपक्षीय व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहेत. यामुळे दोन्ही देशांतील आर्थिक आणि सामरिक संबंध अधिक दृढ होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मोदींसोबतच्या मैत्रीपूर्ण नात्याचा उल्लेख करत पुतिन म्हणाले की, भारत भेटीबाबत त्यांना आनंद आहे. पुढील बैठक भारतात आयोजित करण्याबाबत दोन्ही नेत्यांमध्ये सहमती असल्याचे त्यांनी सांगितले.

पुतिन यांनी दोन्ही देशांतील दीर्घकालीन सहकार्यावर भाष्य करताना सांगितले की भारताने स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या ७७ वर्षांत अद्वितीय विकास साधला आहे. दोन्ही देशांमधील ऐतिहासिक मैत्री आणि व्यापारी-सामरिक संबंध आगामी काळात अधिक मजबूत होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पुतिन यांचा हा भारतातील दहावा दौरा ठरणार असून मोदींच्या कार्यकाळात ते यापूर्वी २०१६, २०१८ आणि २०२१ मध्ये भारतात आले आहेत. तर प्रधानमंत्री मोदी सात वेळा रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत.

# सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्यास वाढत्या वाहनांना आळा बसेल

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वाहनांची संख्या जास्त आहे. मुंबईत तर वाहनांच्या संख्येने विक्रम गाठला आहे. मुंबईत वाहनांची संख्या इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईसह राज्यातील चार चाकी वाहनांची घनता २५ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे. दुचाकी वाहनांच्या संख्येत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. चार चाकी वाहनांची देखील तीच परिस्थिती आहे एकट्या मुंबईत चारचाकी वाहनांचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे. एव्हढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे. त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी वाहनतळांची संख्या मात्र अपुरी आहे त्यात १० हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. रस्त्यांवर असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. जी मुंबईची अवस्था आहे जवळपास तशीच अवस्था राज्यातील अन्य मोठ्या शहरांची आहे. मुंबईसह राज्यातील इतर मोठ्या शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे. सरकारने त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत. वाढत्या वाहनांमुळे मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या. जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाढत्या वाहनांना आळा घालणे आवश्यक आहे. जर मुंबईसह राज्यातील इतर शहरांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्नही सुटेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# कृतज्ञ अभिवादन

पाच हजार वर्षे हिंदू समाजाने अस्पृश्यांचा जो अमानवियअमानुष छळ केला. त्याला त्या समाजाकडुन मिळालेले आंबेडकर हे एक बिनतोड आणि बंडखोर उत्तर होते. आंबेडकर म्हणजे बंड, मूर्तीमंत बंड त्यांच्या देहातील कणाकणातून बंड थैमान घालीत होते. आंबेडकर म्हणजे जुल्माविरुध्द उभारलेली व्रजाची मूठ होय, आंबेडकर म्हणजे ढोंगाच्या डोक्यावर आदळण्यास सदैव सिध्द असलेले भिमाची गदा होय. आंबेडकर म्हणजे जातीभेदावर आणि विषमतेवर सदैव सोडलेले सुदर्शन चक्र होय. आंबेडकर म्हणजे धर्ममार्तंडाच्या वर्णवर्चस्वाचा कोथडा फोडुन त्याची आतडी बाहेर काढणारे वाघनखं होय. आंबेडकर म्हणजे समाजातील सत्ताधाऱ्यांच्या विरुध्द पुकारलेले एक युध्दच होय.

डॉ. बाबासाहेबांनी बौध्द धर्म स्वीकारला, धम्मचक्र प्रवर्तन केले. पण त्यातून आजच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या सर्व प्रशनांचा सांगोपांग विचार पुन्हा पुन्हा केला. तो विचार चालू ठेवण्याला, त्यातून आजच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याला ते स्वत: राहिले नाहीत. ही एक खरोखरच अत्यंत दुर्देवी घटना समजली पाहिजे. डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर ते सर्व प्रश्न अधीकच जिवंत, ज्वलंत आणि स्फोटक बनले आहेत. त्यामधील गुंतागुंतही वाढली आहे. आंबेडकरांच्या पश्चात त्यांची जयंती, महापरिनिर्वाण दिन-दिशा दिन वगैरे सर्व समारोह कसोशीने, निष्ठेने, उत्साहाने, नियमितपणे पाळण्यात येतात. पण बुध्दधम्म स्वीकारण्यापूर्वी आणि नंतर ज्या प्रश्नांचा विचार डॉ. बाबासाहेब स्वत: सतत अहोरात्र करीत होते. त्यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न मात्र नंतर कोणी फारसा केलेला दिसत नाही.

गौतम बुध्दांच्या जीवनांत त्याचे विचार मंथन अखेरच्या क्षणापर्यंत चालूच होते. पण त्यांच्या महापरिनिर्वाणानंतरही त्यांच्या निष्ठावंत शिष्यांनी आणि अनुयायांनी बदललेल्या परिस्थितीच्या आणि प्रश्नांच्या संदर्भात आपले विचारमंथन सतत चालूच ठेवले. बौध्द विचार बुध्दांच्या हयातीत कधी कुंठित झाला नव्हता. बुध्दाच्या शेवटच्या क्षणापर्यंत तो सदा विकासी सदा जिवंतच राहिला. विचाराला पूर्णविराम केव्हाच नसतो. हे बुध्दाता पुरते ठाऊक होते. प्रत्येक खऱ्या बौध्दालाही ते महान सत्य ध्यानात ठेवावेच लागते. डॉ. बाबासाहेबांनी ही आपलया उभ्या आयुष्यात विचारांचा पूर्णविराम कधीच लावला नाही. त्यांचे जिवन आणि विचार सदा जीवंत, ज्वलंत, सदा विकासशील असेच राहिले. नवीन परिस्थिती आणि नवीन प्रश्न यांचे आव्हान सतत स्विकारुनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे विचार सतत विकास पावले.

भारतातील एक महान व्यक्ती नाहिशी झालेली आहे, असे म्हटल्यास त्यात मुळीच अतिश्योक्ती नाही. त्यांचे दांडगे व्यक्तिमत्व, त्यांची प्रगाढ विद्वता, अप्रतिम भाषापांडित्य व महान पंडितांनाही प्रसंगविशेषी निरुत्तर करुन सोडणारा मार्मिक कोटीक्रम इत्यादि गुणामुळेच त्यांची महानता अलिकडील काळात विशेष प्रकर्षाने अखील भारतीय जनतेच्या प्रत्ययास येऊ लागली आहे. अस्पृश्याचे एकमेव नेते व खरे कैवारी म्हणून त्यांनी जितका लौकिक संपादन केला होता, त्यापेक्षा भारतीय घटनेचे एक महान शिल्पकार म्हणून त्यांनी कितीतरी अधीक पटीने लौकिक कमविलेला आहे. भारतीय घटना तयार करतांना त्यांनी कल्पनातीत परिश्रम घेतले व असामान्य बुध्दिमत्ता प्रगट केली. ही खरोखरच संस्मरणीय म्हणावी लागेल. ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कृतज्ञ अभिवादन..

**-प्रभाकर सोमकुवर**
**नागपूर**

# केज-बीड हायवेवरील गतिरोधकांना 'व्हाईट पट्टे', प्रशासनाचे लक्ष वेधले!

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज / प्रतिनिधी**/ केज-बीड हायवेवर, शिक्षक कॉलनीसमोर असलेल्या जीवन शिक्षण शाळेजवळ बसवलेल्या गतिरोधकांवर पिड ब्रेकर्स पांढरे पट्टे (व्हाईट मार्किंग) नसल्यामुळे लहान-मोठे अपघात सातत्याने होत होते. अपघातांचा धोका लक्षात घेऊन शिक्षक कॉलनी मित्र मंडळाच्या उत्साही युवकांनी हा धोका कमी करण्यासाठी थेट पुढाकार घेतला आणि स्वखर्चातून श्रमदान करत गतिरोधकांवर पांढरे पट्टे मारले. या कृतीने त्यांनी एक आदर्श सामाजिक उपक्रम राबवून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

**अपघात टाळण्यासाठी शिक्षक कॉलनी मित्र मंडळाच्या युवकांचा पुढाकार!**

**नेमकी समस्या काय होती?**

केज-बीड हायवेवरील या भागात गतिरोधक आहेत, पण त्यावर गतिरोधक दर्शवणारे पांढरे पट्टे नसल्याने वाहनचालकांना ते वेळेत दिसत नव्हते. यामुळे वाहनांचा वेग नियंत्रणात न राहिल्याने छोटे-मोठे अपघात नित्याचे झाले होते. नागरिक आणि विशेषतः विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला होता.

**युवकांनी साधला आदर्श**

अपघातांची वाढती संख्या पाहून शिक्षक कॉलनी परिसरातील सजग युवकांनी एकत्र येऊन या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन पांढरा रंग विकत घेतला आणि जवळपास एक तास श्रमदान करून गतिरोधकांवर आवश्यकतेनुसार पांढरे पट्टे मारले. या श्रमदानामुळे गतिरोधक आता दूरून स्पष्टपणे दिसत आहेत, ज्यामुळे अपघात होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.

या स्तुत्य सामाजिक उपक्रमात पत्रकार प्रकाश मुंडे, खय्युम भाई शेख, पिटू भैया तांदळे, सोनू वैभव धस, अमोल धस, चंदू चौरे,अमोल मुंडे, संदीप भुतडा, अमर केजकर, विकास मुळे, अमोल ठोंबरे, प्रदिप ठोंबरे, बाळासाहेब तांबडे, अतुल ठोंबरे, गोटू भैय्या पाळवदे, योगेश हांगे, सोहम अंधारे, विठू प्रविण थोरात, राजा राऊत, गालफाडे तात्या, काळे मामा,गणेश ढाकणे, मातोश्री डोअर्स सह अनेक नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.



**प्रशासनाला नागरिकांची कळकळीची मागणी**

युवकांनी मारलेले हे पांढरे पट्टे तात्पुरते आहेत आणि ते जास्त दिवस टिकण्याची शाश्वती नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी आता प्रशासनाकडे कळकळीची मागणी केली आहे की, या महत्त्वाच्या मार्गावरील गतिरोधकांना रस्त्यांच्या नियमांनुसार कायमस्वरूपी व उच्च दर्जाचे पांढरे पट्टे (रोड मार्किंग) त्वरित मारावेत.

शिक्षक कॉलनी मित्र मंडळाने केलेल्या या सामाजिक बांधिलकीच्या कार्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे आणि त्यांनी इतरांसाठी एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

# महिला पोलिस बिट जमादारास शिवीगाळ; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर / प्रतिनिधी**/ देगलूर पोलिस ठाणे हद्दीत कर्तव्यावर असलेल्या महिला पोलिस अंमलदार रिहाना बानू शेख यांना अश्लील शिवीगाळ, विनयभंग व जिवे मारण्याची धमकी देत शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देगलूर शहर पश्चिम विभागातील बीट अंमलदार असलेल्या रिहाना बानू शेख या नगरपरिषद निवडणुकीसंबंधी लेखी आदेश संबंधितांपर्यंत पोहोचविण्याचे काम करत होत्या. त्या जुन्या बसस्थानक परिसरात गेल्या असता तेथे ओम मेडिकलसमोर दोन व्यक्तीत किरकोळ वाद सुरू होता. वाद पाहण्यासाठी मोठी गर्दीही जमली होती.

ही परिस्थिती पाहून रिहाना बानू यांनी संबंधितांना वाद करू नका असे सांगितले.

त्यातील एका व्यक्तीस नोटीस देण्याचा प्रयत्न केला असता आरोपी बाबुराव उर्फ बाबऱ्या शंकर चव्हाण याने त्यांना अश्लील शिवीगाळ केली.

त्यानंतर जिवे मारण्याची धमकी देत त्यांच्या कॉलरला धरून मारहाण केली आणि विनयभंग करत शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

दरम्यान, या प्रकरणात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असताना आरोपीची आई शकुंतला चव्हाण हिनेही पोलिस ठाण्यात गोंधळ घालत महिला पोलिस कर्मचाऱ्यास तुला देगलूरला नोकरी करायची नाही का? असा धमकीवजा प्रश्न विचारत जिवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी महिला अंमलदार रिहाना बानू शेख यांच्या फिर्यादीवरून आरोपी बाबुराव चव्हाण व शकुंतला चव्हाण (मुलगा-आई) यांच्या विरुद्ध विविध कलमांखाली देगलूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राज्य निवडणूक आयोगावर बसपाचे आरोप - पारदर्शकतेचा अभाव मतदारांचा विश्वास कमी करतो

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे (प्रतिनिधी)** बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव डॉ. हुलगेश चलवादी यांनी राज्य निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले. ते म्हणाले की आयोगाच्या कारभारामुळे मतदारांचा विश्वास कमी झाला आहे. आयोगाने पारदर्शकतेचा अभाव दाखवून निवडणुकीच्या वेळापत्रकात बदल केले आहेत, 'व्हीव्हीपॅट' मशीन वापरण्याचे वगळले आणि निकाल पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला.

डॉ. चलवादी यांनी म्हटले की, आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाच्या मर्यादा ओलांडल्या तरी योग्य ती भूमिका घेतली नाही आणि हे मुद्दा न्यायालयाकडे सोडले. आयोगाचे असंवर्तन मतदार, राजकीय पक्ष, उमेदवार आणि निवडणूक कर्मचारी यांच्यात नाराजी निर्माण करणारे आहे.

ते म्हणाले, निवडणूक आयोगाने वारंवार निवडणुकीच्या तारखेत बदल करणे, मतदार यादीसंबंधी ठोस भूमिका न घेणे आणि निकाल पुढे ढकलणे यामुळे आयोगाचे निर्णय असंवैधानिक व सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली घेतले जात असल्याचे दिसते.

# परीगाबाई अवचितराव नलावडे यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**बाजार सावंगी / प्रतिनिधी**/ बाजार सावंगी - खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील ज्येष्ठ नागरिक परीगाबाई अवचितराव नलावडे (वय ८० वर्षे) यांचे



वृद्धापकाळाने बुधवार, दि. ०३ रोजी रात्री दहाला निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. संभाजीनगर बस आगारा वाहक कैलास नलावडे यांची त्या मातोश्री होत्या.अंत्यसंस्कार गुरुवारी सकाळी येथील स्मशानभूमीत पार पडले.

# महामानवाच्या स्मृतीतून मनाला भिडणारा महापरिनिर्वाण दिन

६ डिसेंबर हा भारतीय इतिहासातील एक भावस्पर्शी, चिंतनशील आणि आत्मपरीक्षणाचा दिवस. हा फक्त एका महामानवाच्या देहपरीत्यागाचा दिवस नाही; हा त्या महामानवाच्या विचारज्योतीचा पुनर्जन्मदिन आहे. हा दिवस मानवी स्वाभिमानाची, लोकशाही संस्कृतीची आणि सामाजिक परिवर्तनाची आठवण करून देणारा दिवस आहे. हा दिवस कॅलेंडरवरील फक्त एक दिवस नाही. तो एका महामानवाच्या देहपरीत्यागाचा क्षण असला, तरी त्याच क्षणी त्याच्या विचारांचा जन्म झाला; विचारांच्या क्रांतीची अक्षय ज्योत प्रज्वलित झाली. हा दिवस केवळ शोकाचा नाही; तो अंतर्मनाची जागृती, समाजपरिवर्तनाचा संकल्प आणि लोकशाही संस्कृतीच्या आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. हा दिवस केवळ बाबासाहेबांच्या स्मृतींचा दिवस नसून, न्याय, समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांना नव्याने जागवणारा दिवस आहे. हा दिवस भारतीय समाजाला आत्मचिंतनाची, जागृतीची आणि कृतज्ञतेची साक्ष देणारा 'महापरिनिर्वाण दिन' म्हणून साजरा केला जातो. महापरिनिर्वाण दिन हा स्मरणाचा नाही, तर संकल्पाचा दिवस आहे. अन्यायाविरुद्ध लढण्याचा संकल्प, अंधश्रद्धा, असमानता आणि वर्णभेद मोडून काढण्याचा संकल्प आणि शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा या मंत्राला कृतीत आणण्याचा संकल्प. शिक्षण हेच परिवर्तनाचे शस्त्र, अन्यायाविरुद्ध संघर्षाची ठाम भूमिका आणि संघटित समाज हीच खरी ताकद आहे. बाबासाहेब गेले, पण त्यांचे विचार अमर झाले म्हणूनच 'महापरिनिर्वाण' म्हणजे अंत नव्हे, तर एका विचारक्रांतीचा नवा आरंभ!

बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व केवळ एका महान नेत्याचे नव्हे, तर विचारांचे विश्व होते. गरीब, वंचित, बहिष्कृत आणि शोषित समाजाला त्यांनी कायद्याचा आधार दिला, शिक्षणाची ताकद दिली आणि जगण्याचा स्वाभिमान दिला. मी जन्मलो अंधारात, पण संघर्षाच्या प्रकाशाने जग उजळून टाकले, ही केवळ त्यांची कथा नाही, तर संपूर्ण भारतीय समाजाची नवचैतन्याची कहाणी आहे. बाबासाहेबांनी दिलेले संविधान हे फक्त कायद्यांचे पुस्तक नाही, ते मानवतेचे पवित्र ग्रंथ, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे चार अतूट स्तंभ आहेत. ते फक्त वाचायचे नाहीत, ते जगायचे आहेत. पण आज आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा, आपण या मूल्यांना खरंच जगत आहोत का? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दोन गोष्टी दिल्या, एक म्हणजे जागृक बुद्धी आणि दुसरी म्हणजे जागृत वैचारिक जबाबदारी. आज आपण त्यांना श्रद्धांजली वाहतो तेव्हा फुलांच्या हारात ते समाधानी नसतात; ते समाधानी असतात, जेव्हा आपण त्यांच्या विचारांच्या अंगाऱ्याला कृतीच्या श्वासाने तेज देतो. फुले आणि शब्द वाहून चालणार नाही; विचारांची कृतीमय वाहतूक ही खरी अभिवादनमय श्रद्धांजली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून देशाला कायदे, अधिकार आणि स्वाभिमान दिला. त्यांनी केवळ समाजाच्या उपेक्षित, शोषित घटकांना आवाज दिला नाही, तर संपूर्ण भारताला 'मानव म्हणून जगण्याची कला' शिकवली. त्यांचे विचार, तत्त्वज्ञान आणि संघर्ष आजही प्रकाशस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत. त्यांचे जीवन मुठीत माती घेऊन सुरू झाले पण त्या मातीला त्यांनी ज्ञानाच्या सुवर्णकणांनी समृद्ध केले. जगभरातील ४० दशलक्षांहून अधिक गुलाम मनांना त्यांनी विचारांचा उधाण दिला. जन्मानं हीन, पण कर्मानं महान होण्याची प्रेरणा त्यांनी दिली, शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा, हीच महानायकाची अखेरची शिकवण. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्ञान, संघर्ष आणि स्वाभिमानाची जिवंत शाळा. ते म्हणाले होतेमला माझ्या मृत्यूनंतर पाहायचे असेल, तर माझ्या समाधीवर येऊ नका; माझ्या विचारांकडे पाहा, माझ्या पुस्तकांकडे पाहा, माझ्या संघर्षाकडे पाहा, कारण तिथेच मी जिवंत आहे!

६ डिसेंबरला आपण लाखोंच्या संख्येने मुंबईतील चैत्यभूमीवर जमा होतो; मेणबत्त्या लावतो, पण आपण अंतर्मनात विचारांची ज्योत पेटवतो का? बाबासाहेबांच्या समाधीवर मेणबत्त्या लावता-लावता आपण आपल्या अंतर्मनातील मेणबत्ती प्रज्वलित करतो का? ६ डिसेंबर आपल्याला एक प्रश्न विचारतो, आपण बाबासाहेबांना फक्त वंदन करतो, की त्यांच्या विचारांची वंदनीय कृती करतो? आपण समाज बदलतो की समाजाकडून फक्त भावनिक शब्द घेतो? त्यांनी दिलेल्या संविधानाच्या दिव्यज्योती भोवती आपण सजावट करतो की त्या ज्योतीने अंधारात प्रकाश आणतो? मृत्यू एखाद्या व्यक्तीचा होतो, पण विचार अमर होतो.

डॉ. आंबेडकर देहाने गेले, पण त्यांनी दिलेला संविधानाचा श्वास आजही जिवंत आहे. त्यांची बौद्ध धम्माकडे झेप, ही आध्यात्मिक नाही; ती मानवी प्रतिष्ठेची समानतेची क्रांती होती हीच महामानव आणि आपली जाणीव आहे. त्यांनी शेवटी म्हटलं होतं, मी हिंदू म्हणून मारणार नाही हे धार्मिक वाक्य नव्हतं, ते मानवी अस्मितेचं घोषणापत्र होतं. आजची अत्यंत गरज आहे बाबासाहेबांना समजून घेणे, फक्त पाठ करणे नाही. समाजाला मसिहा नको, समाजाला मार्गदर्शक हवा. देणाऱ्याला देव बनवून थांबू नका तर त्याचा विचार देवत्वाने जगवा. बाबासाहेबांची शिकवण तांत्रिक नाही; ती जीवनतत्त्वज्ञान आहे. ती तत्त्वज्ञान फक्त उधृत केल्याने नाही, तर जगल्याने प्रभावी होते.

आज विषमता, धार्मिक कट्टरता, जातीगत द्वेष, आर्थिक अन्याय पुन्हा समाजाला जखडू पाहत आहेत. अशा वेळी बाबासाहेब जागृत स्वरात आपल्याला आठवण करून देतात राजकीय स्वातंत्र्य व्यर्थ आहे, जोपर्यंत सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळत नाही. आजच्या परिस्थितीत हे वाक्य विशेषतः ठामपणे जाणवते. बाबासाहेब म्हणाले होते, मी ज्या समाजासाठी लढलो, तो समाज जर झोपला तर माझे कार्य अपूर्ण राहील. म्हणूनच आज ६ डिसेंबरच्या निमित्ताने आपण त्यांच्या विचारांचा दीप पुन्हा प्रज्वलित करू या. आज बाबासाहेबांची गरज पुतळ्यांत नाही, तर मनांत आहे. त्यांच्या विचारांची गरज केवळ ग्रंथांत नाही, तर कृतीत आहे. त्यांच्या लोकशाहीची गरज केवळ संविधानात नाही, तर समाजव्यवस्थेत आहे.

महापरिनिर्वाण दिन हा स्मरणाचा नव्हे, संकल्पाचा दिवस आहे. मी जातभेद मोडीन, समतेची वीट बनेन, मी संविधान फक्त वाचणार नाही, तर त्याचा रक्षक बनणार तसेच, मी बाबासाहेबांना स्मरणार नाही तर त्यांच्या विचारांना स्मरणीय करीन, हीच आजची आजची सशक्त प्रतिज्ञा आहे. म्हणून त्यांची शेवटची ओळ जो प्रत्येकाने मनात कोरावी, बाबासाहेबांनी आपल्याला मुक्त केले, पण मुक्ततेची किंमत आपण जपू शकतो का? खरी प्रतिज्ञा अशी असावी.

ही जाणीव, ही जागृती, ही जबाबदारी, यालाच आपण म्हणू शकतो महापरिनिर्वाणाची खरी श्रद्धांजली! आज डॉ. आंबेडकर आपल्यात नाहीत, पण त्यांचे विचार आपल्यात आहेत. ते विचार आपल्याला सजग करतात, सशक्त करतात, आणि माणूस म्हणून जगण्याची कला शिकवतात. ज्या समाजात मनुष्य मनुष्याचा शत्रू नाही, ज्या समाजात बंधुता हीच खरी संपत्ती आहे, असा समाज घडवण्याचे स्वप्न बाबासाहेबांचे होते. हे स्वप्न जगणे, जपणे आणि पुढील पिढीकडे पोहोचवणे हेच खरे महापरिनिर्वाण! विचार अमर आहेत. मेणबत्तीच्या प्रकाशापेक्षा अंतर्मनाचा प्रकाश उजळवू या. महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भावपूर्ण आदरांजली !

**-प्रविण बागडे**
**नागपूर**

## संक्षिप्त

### सोयगाव येथे जागतिक एड्स दिवस उत्साहात साजरा




**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/प्रतिनिधी**/ डॉ. दिनाजी खंदारे (वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय सोयगाव) यांच्या मार्गदर्शनाखाली आयसीटीसी सोयगाव आणि कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (ता. ४) जागतिक एड्स दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात ग्रा. रूग्णालयातील समुपदेशक सुनील वानखेडे यांनी एचआयव्ही-एड्सविषयी माहितीपूर्ण व्याख्यान देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अडथळ्यांवर मात करू, एकजुटीने एचआयव्ही/एड्सला लढा देऊया हे या वर्षीचे प्रमुख घोषवाक्य विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.या कार्यक्रमाला ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. शैलेश खंदारे, समुपदेशक अतुल मुळे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य अनुराधा विनोद पवार, प्रा. विजय भीमराव देसाई, आशिष पाटील, स्वप्निल वामने, ऋषिकेश निकम, राजेंद्र रोकडे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.जागतिक एड्स दिनानिमित्त जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

### आश्रम शाळा घाणेगाव तांडा येथे जागतिक दिव्यांग दिवस उत्साहात साजरा




**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/प्रतिनिधी**/सोयगाव तालुक्यातील वि.जा. प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, घाणेगाव तांडा येथे जागतिक दिव्यांग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.हक्क देऊ, संधी देऊ; दिव्यांगांना प्रोत्साहन देऊ, सर्वांचा निर्धार - दिव्यांगाचा स्वीकार, तुमचा-आमचा एकच नारा, दिव्यांगांना देऊ सहारा अशा जनजागृतीपर घोषणा देत विद्यार्थ्यांची भव्य रॅली गावातून काढण्यात आली.कार्यक्रमास सोयगाव केंद्रप्रमुख फिरोज तडवी, सावळतबारा केंद्रप्रमुख जनार्दन साबळे, प्रगती उर्दू हायस्कूल सोयगावचे मुख्याध्यापक शेख नदीम, जि.प. प्रशाला जंगला तांडा येथील सहशिक्षक राहुल सोनार, माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक संजय पाटील, प्राथमिक शाळा घाणेगाव तांडा चे मुख्याध्यापक दिवाकर लवांडे, तसेच आश्रम शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वसतिगृह अधिक्षिका व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाद्वारे दिव्यांग विद्यार्थ्यांविषयी जागरूकता, संवेदनशीलता आणि स्वीकार वाढवण्याचा संदेश देण्यात आला.

# ‘अन्नामृत’ची करामत ४० हजार बालकांची रोज ‘अंगत पंगत’

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** अन्नामृत फाऊंडेशन ही इस्कॉन अंतर्गत काम करणारी संस्था सामुहिक स्वयंपाक घराद्वारे आजमितीस जिल्ह्यातील (प्रामुख्याने शहरातील) ४० हजार बालकांपर्यंत शालेय पोषण आहार पोहोचविण्याचे काम करते. त्यामुळे दररोज ४० हजार बालकांची शाळा शाळांमधून ‘अंगत-पंगत’ घडविण्याची करामत अन्नामृत फाऊंडेशन करीत आहे.शासन, स्वयंसेवी संस्था आणि उद्योगांमधील सामाजिक उत्तरदायित्व निधीचा वापर करुन शालेय पोषण आहार तयार करुन तो वितरीत करण्यासाठी अन्नामृत या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेचे सामुहिक स्वयंपाकघर गरवारे स्टेडियम जवळच आहे. तेथे अत्याधुनिक पद्धतीने व बालकांच्या पोषणासाठी आवश्यक अन्न घटकांचा समावेश करुन अन्न शिजविले जाते व ते वेळेवर, स्वच्छता राखून शाळांपर्यंत पोहोचविले जाते.

**१६८ शाळा आणि ८० बालवाड्यांमध्ये पोहोचविला जातो आहार**

छत्रपती संभाजीनगरच्या सिडको भागात ‘अन्नामृत’चे स्वयंपाक गृह आहे. ‘इस्कॉन’ तर्फे देशात असे २० स्वयंपाक गृह चालविले जातात. त्यातील एक छत्रपती संभाजीनगर मध्ये आहे. हे स्वयंपाकगृह १६८ शाळांमध्ये (प्रामुख्याने शहरी भागात) सुमारे ३८ हजार विद्यार्थी व ८० बालवाड्यांमधील ३५०० बालकांपर्यंत आहार पोहोचवितात.

**अत्याधुनिक स्वयंपाक घर**

‘अन्नामृत’चे स्वयंपाक घर हे एक अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरुन बनविलेले स्वयंपाक घर आहे. ह्या स्वयंपाक घरात अन्न बनविण्यासाठी थर्मल इन्स्युलेटर तंत्राचा वापर करण्यात येतो. त्यामुळे स्वयंपाक घरात जाळ, धूर विरहित उष्णतेद्वारे अन्न शिजविले जाते.

अन्न पोहोचविण्यासाठी सुरक्षित कंटेनर्स

शिजवलेले अन्न मुलांपर्यंत पोहोचविण्यासाठी मोठ्या कंटेनर्सचा वापर केला जातो. त्यासाठी प्रत्येक डब्ब्याला सिल करुन त्या सिलचा कलर कोड दिला जातो. त्यानुसार त्या डब्ब्यात काय पदार्थ आहे हे शाळेचे मुख्याध्यापक ओळखू शकता. एकूण १४ वाहनांद्वारे हे अन्न पोहोचविले जाते. शिवाय ज्या वाहनाद्वारे हे अन्न पोहोचविले जाते त्या प्रत्येक वाहनाचे जीपीएस ट्रॅकींग केले जाते. स्वयंपाक घरातून निघालेले वाहन हे रस्त्यात केवळ वाहतुक सिग्नल व्यतिरिक्त कुठेही थांबवता येत नाही. थांबते ते थेट शाळेतच. त्यामुळे वेळेवर आणि कमीत कमी वेळात अन्न पोहोचविता येते.

पोषणयुक्त आहार

संस्थेच्या आहार बनविण्याच्या वेळापत्रकात व्हेज पुलाव, व्हेज खिचडी, मुगडाळ खिचडी, चना खिचडी, चना पुलाव, मटर पनीर भात, मटकी, सोयाबीन पुलाव, शेवग्याचे मुगडाळीचे वरण, भात याशिवाय चिक्की, खजूर अशा पोषणयुक्त आहाराचा समावेश केला जातो. जेणेकरुन बालकांना रोज वेगळ्या चवीचे पदार्थ खायला मिळतील व पोषणयुक्त आहार ही. त्यासाठी नवनवीन पदार्थांचा व अन्न घटकांचा समावेश आहारात केला जातो,असे



व्यवस्थापक सुदर्शन पोटभरे यांनी सांगितले.

मटर पनीर डिश आणि मान्यवरांचा सहभाग

आज टोफू पनीरचा वापर करुन मटर पनीर डिश बनवण्यात आली. त्यात मनपा अतिरिक्त आयुक्त श्रीमती कल्पिता पिंपळे , काळे ग्रुप ऑफ कंपनीजचे संचालक अंकित काळे संचालक, कायगाव पेपर मिलचे चेअरमन प्रकाश राठी, वरिष्ठ व्यवस्थापक अलाइंड पॅकेजिंग कंपनी रविशंकर खानापुरे, वरिष्ठ व्यवस्थापक महिको समूह मिलिंद करंजीकर यांनी सहभाग घेतला व या मान्यवरांनी विद्यार्थ्यांसोबत पोषण आहाराचा आस्वादही घेतला. याप्रसंगी राजन नाडकर्णी, अन्ननामृतचे सुदर्शन पोटभरे यांनी उपस्थितांना माहिती दिली. जिल्हा परिषद शाळा वरझडी तालुका छत्रपती संभाजीनगरचे मुख्याध्यापक अंकुश चव्हाण, मनपा शाळा नारेगाव येथील प्रतिनिधी विद्यार्थी व शिक्षक देखील उपस्थित होते.

**सहयोगी घटकांचा सहभाग**

या प्रक्रियेत सहयोगी घटकांचा सहभाग घेतला जातो. जे दाते या प्रकल्पाला मदत करतात त्यांच्या नियमित भेटी आयोजीत करुन त्यांना अन्न शिजविण्याची सर्व प्रक्रिया दाखविली जाते. अन्न पदार्थ हाताळणी, पॅकींग, पार्सल रवाना अशा सर्व टप्प्यांबाबत माहिती दिली जाते. याशिवाय जे विद्यार्थी हे अन्न प्रत्यक्ष खातात त्यांनाही ‘माझं जेवळ कसं बनतं?’ हे जाणून घेण्यासाठी गटागटाने विद्यार्थ्यांच्याही भेटी आयोजीत करुन त्यांना संतुलित आहाराबाबतही माहिती दिली जाते.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात एड्स व थॅलेसेमिया विषयक मार्गदर्शनपर व्याख्यान

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/प्रतिनिधी**/अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स व थॅलेसेमिया विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.ग्रामीण रुग्णालय, सोयगाव येथील समुपदेशक सुनील शामराव वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही/एड्स संदर्भात माहिती देत समुपदेशन केले. त्यांनी विद्यार्थ्यांचे एचआयव्हीबद्दलचे गैरसमज दूर करून योग्य जनजागृती केली. त्यांच्या सोबत समुपदेशक अतुल सुनीलराव मुळे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. के. बारोटे यांनी एड्सविषयी सखोल माहिती देत विद्यार्थ्यांना सजग राहण्याचे आवाहन केले. तसेच ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. अनिकेत घोडके यांनी थॅलेसेमिया या आजाराबद्दल सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांना जागरूक केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांना या दोन्ही आजारांबद्दल अधिक माहिती देत जनजागृतीचे महत्त्व पटवून दिले.

या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. आर. के. बारोटे, कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ. उल्हास पाटील, प्रा. अनिल मानकर, डॉ. ग्यानबा भगत, महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच छडड चे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छडड कार्यक्रम अधिकारी डॉ. निलेश गावडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. निलेश गाडेकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छडड स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी डॉ. निलेश गावडे, डॉ. पंकज गावित, डॉ. सुनील चौधरे आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# नाचनवेल आरोग्य केंद्रात श्रीमती शारदा वाघ यांचा निरोप समारंभ उत्साहात

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील नाचनवेल येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात श्रीमती शारदा रंगनाथ वाघ यांनी ३४ वर्षांच्या सेवेला निरोप घेतला. या निमित्त आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमात त्यांना आरोग्य सहायिका (डक्त) पदोन्नती मिळाल्याबद्दल सन्मानित केले गेले.

कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी वर्षा शेवगण, वैद्यकीय अधिकारी प्रणोती हेडाऊ, आरोग्य सहाय्यक सपकाळ, आरोग्य सहाय्यक सोनवणे, आरोग्य सहायिका राजपूत, औषधनिर्माता जे. बी. राठोड, प्रयोगशाळा तंत्रज्ञ पी. जायभाये, आरोग्य सेवक घुले, मगारे, डहाके, निकम, रोडगे, तसेच आरोग्य सेविका स्वाती काथार, सविता सुडके, रुपाली दवंगे, ज्योती काळे, मनीषा खरात व सीमा सपकाळ, रुखमण तायडे उपस्थित होते.

यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी नरवडे, सावंत, श्रीमती पवार, काटकर व पोटे देखील उपस्थित होते. कार्यक्रमात श्रीमती काळे आणि श्रीमती खरात यांनी श्रीमती वाघ यांच्याबद्दल मनोगत व्यक्त केले. डॉ. वर्षा शेवगण व डॉ. प्रणोती हेडाऊ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर आरोग्य सेवक घुले यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन दवंगे सर व आकाश यांनी केले.अत्यंत खेळीमुळे आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा समारंभ संपन्न झाला.

# हजरत बाहोद्दीन बाबा दर्गाहजवळील पिरबादी पुलाला कठडे नाही; दुर्गंधीचा त्रास, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी** / फुलंब्री शहरातील हजरत बाहोद्दीन बाबा दर्गाहजवळील पिरबादी पुलाजवळ फुलमस्ता नदीमध्ये तीव्र दुर्गंधी पसरली असून, परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. शहरातील ड्रेनेजचे पाणी थेट फुलमस्ता नदीत सोडले जात असल्यामुळे नदीचे पाणी दूषित झाले आहे आणि हेच दूषित पाणी पुढे फुलंब्रीच्या तलावात मिसळत असल्याने परिस्थिती आणखी चिंताजनक बनली आहे. तलावातील हेच पाणी पुढे नळाद्वारे नागरिकांना मिळत असल्याने लहान मुले, वृद्ध आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

नागरिकांच्या ीशशिरींशव तक्रारीनंतरही फुलंब्री नगरपंचायतीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचा आरोप केला जात आहे.


**उघड्यावर नाले व डासांचा त्रास**

हजरत जमालशहा बाबा दर्गाहजवळील बाजारपट्टी परिसरात उघड्यावर नाल्यांमुळे मोठ्या प्रमाणावर डासांची वाढ झाली आहे. गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांना दररोज या समस्येमुळे त्रास सहन करावा लागत असून, तातडीने नाले बंद करण्याची मागणी होत आहे.

**पिरबादी पुलावर कठडे नसल्याने जीवितहानीची भीती**

पिरबादी पुलावर दोन्ही बाजूंच्या कठड्यांची अवस्था अत्यंत खराब आहे. काही ठिकाणी ते पूर्णपणे तुटले असून, लोखंडी पाईप किंवा जाळी बसविण्याची तातडीची गरज व्यक्त केली जात आहे. पुलाच्या खाली खोल पाणी असून, पुलावर मातीचा ढिगाराही पडलेला आहे.

काही दिवसांपूर्वी एका दुचाकीस्वाराला पुलावरील सुरक्षितता अभावामुळे नदीत पडावे लागले होते. सुदैवाने जीवितहानी झाली नाही; मात्र दुचाकीचे मोठे नुकसान झाले.या पुलावरून फकीर मोहम्मद उर्दू शाळा, भारत माता शाळा, संत सावता माळी गुरुकुल, वानखेडे शाळा या शाळांतील शेकडो लहान मुले दररोज जातात. कठडे नसल्यामुळे एखाद्या चुकून पाहणाऱ्या मुलाचे पाय घसरल्यास गंभीर दुर्घटना होऊ शकते, अशी भीती पालक व्यक्त करत आहेत.



**नागरिकांची मागणी**

पिरबादी पुलावर दोन्ही बाजूंना लोखंडी पाईप / जाळी बसवावी,फुलमस्ता नदीतील घाण पाणी त्वरित साफ करावे. ड्रेनेजचे पाणी नदीत सोडणे तातडीने बंद करावे.व उघड्यावरच्या नाल्यांची स्वच्छता करून झाकणे बसवावे.

मी वार्ड क्रमांक ९ मध्ये राहतो. बाजारपट्टी परिसरात प्रचंड दुर्गंधी जाणवत आहे. ड्रेनेजचे पाणी थेट नदीत सोडले जाते आणि तेच पाणी तलावात व नळांमध्ये येते. ही अत्यंत गंभीर बाब आहे. तसेच पिरबादी पुलावर कठडे नसल्याने जीवितहानीची शक्यता आहे. नगरपंचायतीने त्वरित कारवाई करावी.

**- शाकेर इसाक पटेल, फुलंब्री**

**माजी लोकप्रतिनिधींवर नागरिकांचा रोष**

स्थानिक नागरिकांच्या मते, फुलंब्रीतील हा ज्वलंत प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. नगरपंचायत आणि माजी लोकप्रतिनिधींनी या गंभीर समस्येवर लक्ष न दिल्याचा आरोप नागरिक करत असून, नागरिकांच्या जीवाशी खेळ केला जात आहे, अशी टीका करण्यात आली आहे.

# मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेत महाराष्ट्राचा विश्वविक्रम गिनीज बुकमध्ये नोंद

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**महाराष्ट्राने ’मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेत विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक केला आहे. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली आहे. गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, दि ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे, छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट, ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्य अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनल्स आणि कृषीपंप असा संपूर्ण संच देण्याच्या ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ या योजनेत महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे. ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषीपंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो.

राज्यात साडेदहा लाख सौर कृषीपंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे कृषीपंपासाठी पैसे भरून वीज जोडणीची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा ‘पेड पेंडिंग’चा प्रश्न सुटणार आहे. ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो.

त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे.सौर पॅनल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषीपंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीजपुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

# संक्षिप्त

## ११ डिसेंबर रोजी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** भारतमातेच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राणार्पण केले, अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जिवनातील अडी-अडचणी दुर करुन त्यांचे दैनंदिन जिवन सुसह्य व्हावे यासाठी व त्याचप्रमाणे युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातुन सेवा निवृत्त झालेल्या जवानांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी संपुर्ण भारतात ७ डिसेंबर हा दिवस ध्वजदिन म्हणुन साजरा करण्यात येतो. व त्या निमित्ताने ०७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेर पर्यंत ध्वजदिन निधी संकलन केले जाते. दरवर्षी प्रमाणे या वर्षीही जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना यांचे वतीने सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलन शुभारंभ गुरुवार दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी दूपारी ३ वाजता महासैनिक लॉन, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, क्रीडा संकूलासमोर, जालना येथे जिल्हाधिकारी तथा जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समिती अध्यक्ष आशिमा मित्तल यांच्या शुभहस्ते तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल व इतर प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.तसेच माजी सैनिक, विधवा पत्नी यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती, आर्थिक मदतीचे धनादेश, गौरव पुरस्कार व प्रशस्तीपत्र वाटप करण्यात येणार आहेत. तरी जिल्ह्यातील सर्व वीर पत्नी, वीर पिता, वीर माता, माजी सैनिक विधवा पत्नी, माजी सैनिक व त्यांचे अवलंबित, पत्रकार बांधव, उत्कृष्ट संकलन केलेल्या कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी व सामान्य नागरिकांनी सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## शिकाऊ उमेदवारीसाठी भरती मेळावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्राकडून जालना येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पंतप्रधान राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन दि.८ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आला आहे. भरती मेळाव्यात जालना, छत्रपती संभाजीनगर व जालना येथील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. अंतिम वर्षात शिकत असलेल्या प्रशिक्षणार्थी व उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांनी भरती मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहप्रशिक्षणार्थी सल्लागार, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि.८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला समितीवर नियुक्त शासकीय सदस्य, अशासकीय सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे. तसेच सर्वसामान्य नागरिकांचे ग्राहक हितासंबंधीत तक्रार असल्यास सदर बैठकीच्या दिवशी उपस्थित राहून आपला लेखी स्वरुपाचा अर्ज सादर करावा. तसेच नागरिकांना ग्राहक या संबंधाने काही अडचणी असल्यास त्याबाबत जालना जिल्ह्याचे संकेतस्थळ क्षरश्रपर.पळल.ळप यावर ग्राहकांच्या तक्रारीसाठी पोर्टल उपलब्ध करुन दिलेले असून नागरिकांनी त्यांच्या समस्या या पोर्टलच्या माध्यमातून सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जालना संरक्षण परिषदेचे सदस्य सचिव सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आगामी परीक्षांचे वेळापत्रक प्रसिध्द

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शासनाच्या मागणीनूसार शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरीता वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. त्यानूसार वर्ष-२०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांचे दिनांक निश्चित करण्यात आले आहेत. तरी संघ लोकसेवा आयोग, विविध विद्यापीठे, परीक्षा घेणाऱ्या इतर संस्था आदिकडून आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षांचे वेळापत्रक विचारात घेवून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन २०२६ मध्ये आयोजित विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. या स्पर्धा परीक्षा बाबतच्या अधिक माहितीसाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. सविस्तर वेळापत्रक- https://mahasamvad.in/१८५०८६/ या लिंकवर उपलब्ध आहे. अशी माहिती अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## मतदार याद्यांवरील आक्षेपांची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी : शेख महेमूद

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना महानगरपालिकेच्या आगामी निवडणूक कार्यक्रमांतर्गत प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात घोळ समोर आल्याने इच्छुक उमेदवारांसह नागरिकांकडून प्रशासनाकडे अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत. या आक्षेपांची गंभीर दखल घेऊन तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा गट) जालना शहर जिल्हा अध्यक्ष शेख महेमूद यांनी केली आहे.

शहरातील प्रारूप मतदार याद्यांमध्ये झालेली अफरातफर, नामावलीतील विसंगती आणि प्रभागनिहाय चुकीचे दाखवलेले आकडे यामुळे नागरिकांनी ३ डिसेंबर २०२५ पर्यंत मोठ्या प्रमाणावर आक्षेप नोंदवले आहेत. काही प्रभागांमध्ये लोकसंख्येपेक्षा मतदारांची संख्या अधिक दाखविण्यात आल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे, तर काही ठिकाणी उलट परिस्थिती आहे. या सर्व प्रकारांची चौकशी करून नियमानुसार योग्य दुरुस्ती करावी, असेही शेख महेमूद यांनी सांगितले.

त्यांनी दिलेल्या माहितीनुसार-

प्रभाग क्र. २ मध्ये लोकसंख्या १८,६१७ असून मतदार १८,१३९ दाखविण्यात आले आहेत.

प्रभाग क्र. १० मध्ये १७,९५५ लोकसंख्येवर १८,४१० मतदार दाखवले आहेत.

प्रभाग क्र. १२ मध्ये लोकसंख्या १५,९७३ असून मतदार संख्या १५,४९४ आहे.

ही तफावत गंभीर असून निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते, असे शेख यांनी नमूद केले.प्रभागातील प्राप्त आक्षेपांची शहानिशा करताना मतदारांना प्रत्यक्ष भेटून पडताळणी करावी, चुकीच्या प्रभागात नावे समाविष्ट झाल्यास ती तत्काळ वगळून योग्य प्रभागात पुन्हा नोंदवावीत, अशी मागणीही त्यांनी निवडणूक प्रशासनाकडे केली आहे.

## शितल मोरे प्रकरण तीव्र

**आत्ताच एक्सप्रेस**

**अर्धापूर /प्रतिनिधी/** शहरातील सावतामाळी नगर (शिध्द-ोधन नगर) येथील शितल मोरे हिचा संशयास्पद मृत्यू हा अपघात नसून जाणूनबुजून केलेला अत्याचार आणि हत्या असल्याचा आरोप पिडितेच्या कुटुंबियांनी केला असून या प्रकरणात उर्वरित आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी जिल्हाधिकारी नांदेड,पोलिस अधीक्षक नांदेड,विशेष पोलिस महानिरीक्षक तसेच विविध उच्चस्तरीय यंत्रणांकडे करण्यात आली आहे.घटनेची पार्श्वभूमी-दस्त ऐवजातील माहिती नुसार,१८ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्रामीण पोलीस ठाणे नांदेड हद्दीत शितल मोरे यांचा मृतदेह संशयास्पद परिस्थितीत आढळला. घटनास्थळावरील परि स्थिती आणि मृतदेहावरील जखमांचे स्वरूप पाहता हा साधा अपघात नसून अत्याचार व मारहाणीचा गंभीर प्रकार असल्याचे पीडितांचे म्हणणे आहे.

महाराष्ट्र शासन

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर**

**कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ) पैठण**

Email:-jidnnngmail.com

**ई-निविदा सुचना क्र. १२/२०२५-२६ (दुसरी वेळ)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ) पैठण जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता बि-१ नमुन्यातील ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ) पैठण यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र | कामाचे नाव | जिल्हा | कंत्राटदाराचा नोंदणीकृत वग | निविदेची किंमत (GST व्यतिरीक्त) |
|---|---|---|---|---|
| १. | M $ R works under jurisdiction of Jayakwadi Irrigation Sub-Divison N.14 Wadigodri | जालना | वर्ग ४ अव त्यावरील | रु.६१.१४ लक्ष |
| २. | M $ R works under jurisdiction of Jayakwadi Irrigation Sub-Divison N.15 Tirthapuri | जालना | वर्ग ४ अव त्यावरील | रु.५४.०९ लक्ष |
| ३. | Various M $ R works under jurisdiction of Jayakwadi Irrigation Sub-Divison N.3 Tirthapuri | जालना | वर्ग ४ अव त्यावरील | रु.५५.२९ लक्ष |

निविदेची बयाना किंमत रुपयेः- निविदा किंमतीच्या १%
कोरी निविदा किंमत रुपये :-२३६०/- प्रत्येकी (GST सह)
निविदा उपलब्ध कालावधी :- ०५/१२/२०२५ ते १२/१२/२०२५
निविदा उघडण्याचा दिनांक :- १५/१२/२०२५ ११:०० वा.
खालील ठिकाणी ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरिल संकेतस्थळावर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ) पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक.

जा.क्र.३४४८ दि.०१/१२/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय जायकवाडी पाटबंधारे विभाग
नाथनगर उत्तर पैठण

**स्वाक्षरीत/-**
**(श्री.प्र.पु.संत)**
**कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग**
**नाथनगर (उ) पैठण**

**आरओसी-२०२५-२६/क्र-५/C४३७३**

# रुई येथील शेतात बिबट्याने पाडला गाईचा फडशा

**आत्ताच एक्सप्रेस**

**सुखापुरी /प्रतिनिधी /** अंबड तालुक्यातील रुई परिसरात बिबट्यांच्या वाढत्या हालचालींमुळे ग्रामस्थ आणि शेतकरी प्रचंड भीतीच्या छायेत दिवस काढत आहेत. गुरुवारी सकाळी उघडकीस आलेल्या नव्या घटनेत शेतकरी पंढरीनाथ प्रभाकर राजगुरू यांच्या शेतातील गोठ्यात रात्री बांधून ठेवलेल्या कालवडीवर बिबट्याने हल्ला करून तिचा जागीच फडशा पाडला. विशेष म्हणजे गेल्या वीस दिवसांत ही भागातील बिबट्याची दुसरी जीवघेणी घटना ठरली असून परिसरात भीतीसोबत रोषाचीही भावना वाढीस लागली आहे.

**वीस दिवसांत दुसरी घटना; परिसरात भीतीचे वातावरण**

**हल्ल्याची माहिती मिळाल्यावर ग्रामस्थांची धावपळ**

पहाटेच्या सुमारास गोठ्याकडून मोठा आवाज आल्याने राजगुरू कुटुंबीय सतर्क झाले. त्यांनी बाहेर येताच गोठ्याकडे धाव घेतली आणि आत प्रवेश करताच त्यांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेली कालवड दिसली. प्राण्याची मान, पाठीचा भाग आणि शरीरभर खोल जखमा दिसून आल्या. जखमांचे स्वरूप पाहता हा बिबट्याचाच हल्ला असल्याचे स्पष्ट झाले. घटनेमुळे घरच्यांसह शेजारच्या शेतकऱ्यांमध्येही भीती आणि चिंता पसरली.

**वनविभागाची पथके तातडीने दाखल**

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी-वनपाल बी. एम. पाटील, वनरक्षक कैलास कदम, वनसेवक शेषराव राठोड, संतोष राठोड तसेच पशुवैद्यकीय अधिकारी सिद्दीकी-घटनास्थळी पोहोचले.

त्यांनी पंचनामा केला, मृत कालवडीची तपासणी करून अहवाल तयार केला. बिबट्याचे पगमार्क, शरीरावरील जखमांचे स्वरूप, आजूबाजूचा पसारा पाहता हा हल्ला रात्री उशिरा झाल्याचा अंदाज अधिकाऱ्यांनी वर्तवला.

**गावकऱ्यांमध्ये वाढत्या दहशतीची भावना**

गावातील रहिवाशांच्या मते, वीस दिवसांपूर्वी गावाच्या दुसऱ्या टोकालाच अशाच प्रकारे गाईवर बिबट्याने हल्ला केला होता. त्या घटनेनंतर वनविभागाने गस्त वाढवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र पुन्हा अशीच घटना घडल्याने ग्रामस्थांची चिंता अधिकच वाढली आहे. अनेक शेतकरी तर रात्री शेतात जाण्यास घाबरत आहेत. पाळीव जनावरांना सांभाळणे अवघड झाले आहे, अशी हळहळ अनेकांनी व्यक्त केली.

**ऊसतोडणीमुळे प्राण्यांच्या हालचाली वाढल्या**

वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की सध्या परिसरात ऊसतोडणी मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याने बिबट्यासह इतर वन्यप्राणी उसाच्या दाट आच्छादनातून बाहेर पडत आहेत. लपण्यासाठी जागा कमी झाल्याने ते गावाच्या हद्दीत फिरताना दिसत आहेत. या हालचालींमुळे शेतकरी व




आदिवासी वस्तींच्या दिशेने प्राण्यांचा संपर्क वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजरा लावण्याची तयारी**

घटनेनंतर विभागाने रुई परिसरात पिंजरा लावण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.बिबट्याचा ठावठिकाणा शोधण्यासाठी विशेष पथक पाठवले जाणार असून, परिसरात गस्त वाढवण्याचेही नियोजन आहे. जनावरांवर पुन्हा हल्ले होऊ नयेत म्हणून आम्ही तातडीने उपाययोजना करीत आहोत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना सतर्कतेचे आवाहन

वनविभागाने नागरिकांना सतत सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

शेतात एकटे जाणे टाळावे

शेतात जाताना काठीला घुंगरू किंवा आवाज करणारे साधन वापरावे

**पिकात वाकून काम करताना विशेष काळजी घ्यावी**

जनावरांना रात्री सुरक्षित ठिकाणी बांधावे

गावकऱ्यांनी एकत्र चालण्याची सवय लावावी

ग्रामस्थांनी दक्षता घेतल्यास अनिष्ट घटना टाळता येऊ शकतात, असे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.दरम्यान, गावकऱ्यांनी वनविभागाकडे तातडीने प्रभावी उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. आमच्या जनावरांचे संरक्षण करा, अन्यथा आम्ही आंदोलन करू, असा इशाराही काही शेतकऱ्यांनी दिला असून,रुई परिसरात बिबट्याच्या दहशतीमुळे वातावरण अधिकच तणावपूर्ण झाले आहे.

# अंबड खरेदी-विक्री संघाच्या संचालकपदी संजय आबा जाधव यांची निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड /प्रतिनिधी/** येथील खरेदी-विक्री सहकारी संघाच्या संचालकपदी श्री. संजय आबा जाधव यांची नुकतीच निवड झाली असून या निवडीबद्दल धनगर पिंपरी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.हा गौरव सोहळा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री तथा माजी खासदार रावसाहेब पाटील दानवे आणि कार्यसम्राट आमदार नारायण भाऊ कुचे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात मान्यवरांनी संजय जाधव यांनी खरेदी-विक्री संघाच्या माध्यमातून शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी सातत्याने काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यांच्या निवडीमुळे परिसराच्या सर्वांगीण विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

संचालकपदी झालेल्या निवडीबद्दल गावकऱ्यांनी आणि उपस्थित मान्यवरांनी श्री. संजय आबा जाधव यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी धनगर पिंपरी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात प्रमुख उपस्थिती-भास्कर नरोडे, पांडुरंग टोम्पे, भानुदास मुळे, गंगाधर आरगडे, नारायण कदम, दामोदर सावंत, नारायण नरोडे, विकास आधे, राजू माने, ईश्वर सावंत, अशोक भोसले, अशोकराव जाधव,



बळीराम वरे, रामेश्वर आरगडे, सतीश खांडेकर, बाबासाहेब आधे, शंकर नरोडे, शिवाजी नरोडे, वाल्मीक आधे, गणेश सुराशे, संतोष खांडेकर, कृष्णा आरगडे, नवनीत मुळे, रामेश्वर टोम्पे, जगताप मामा, विकास खांडेकर, सुमन उपाशे, सुशील खांडेकर, संकेत खांडेकर, शिवाजी मुळे, बद्री बेंद्रे, महेश आरगडे, संजय कोल्हे, शिवाजी सारगुडे, गोविंद सावंत, गणेश मोरे, रोहित नरोडे, गणेश आरगडे, सतीश टोम्पे, सतीश साळुंके, योगेश कचरे, ज्ञानेश्वर पुरी आदींसह मोठ्या संख्येने प्रतिष्ठित नागरिक व धनगर पिंपरी मित्रमंडळ उपस्थित होते.

# भिक्यु शिवली अंगुलीमाल शाक्यपुत्र थेरो यांचे आंतरराष्ट्रीय महापिरत्राणासाठी बौध्दगया प्रस्थान

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** जालना येथील नागेवाडी बुध्दविहारचे सचिव भिक्यु शिवली अंगुलीमाल शाक्यपुत्र थेरो यांचे आंतरराष्ट्रीय महापिरत्राणासाठी बौध्दगया येथे प्रस्थान झाले.त्यांच्या बौध्द उपासक व उपासिकांच्या वतीने दि. २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता जालना रेल्वे स्थानकावर स्वागत करण्यात आले.

स्वागत समारंभात शिवलाल गाडगे, बाबासाहेब




वानखेडे, सदानंद टवले, रविंद्र शिंदे, कविता बुक्तरे, कांताबाई सदावर्ते, प्रयागबाई मगरे, ड. उमाकांत धर्मा पैठणे, बालकिशन धर्मा पैठणे, कमलाबाई पारधे, रंजनाबाई शिरसाठ, सय्यद सलमान, विशाखा टवले, सायली मगरे, श्रीमती वाहुळे, अशोक पंडीत, कांताबाई रत्नपारखे, सुभाष पोघरे, भिमराव पांडव, प्रदिप रत्नपारखे, अनिल वाघमारे, संतोष गायकवाड, अक्षदा पंडीत, गौतम वानखेडे आदी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813